'मराठी दलित कादंबरीतील सामाजिकता: एक विवेचक अभ्यास'
(इ.स. १९६० ते १९९०)

आधुनिक मराठी साहित्यात इ.स. १९६० नंतर विविध साहित्यप्रवाह उदयास आले. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, बालसाहित्य, जनवादी साहित्य, मुस्लिम साहित्य इ. साहित्यप्रवाह हे विकसित झालेले आहेत. त्यापैकी दलित साहित्य हा साहित्यप्रवाह अत्यंत महत्त्वपूर्ण आणि विकसनशील ठरला आहे. दलित साहित्यातील कथा, कविता, आत्मकथने, नाटके, वैचारिक लेखन इ. वाङ्‌मय प्रकाराप्रमाणेच दलित कादंबरी हा वाङ्मय प्रकार प्रभावीपणे आलेला आहे.

'मराठी दलित कादंबरीतील सामाजिकता : एक विवेचक अभ्यास' (इ.स. १९६० ते १९९०) हा संशोधन विषय निवडण्यामागचा मुख्य हेतू म्हणजे दलित कादंबरी ही भारतीय समाजरचनेच्या विशिष्ट मानसिकतेला आणि कृतीउक्तीला छंद देण्याचे कार्य करते. दलित कादंबरीमधून दलित समाजातील जातीव्यवस्था, अस्पृश्यता, वर्णव्यवस्था, सामाजिक बांधिलकी, मानवतावाद, वर्गसंघर्ष, स्त्रियांवरील अत्याचार, दारिद्रय, वेदना, विद्रोह, नकार, आर्थिक शोषण, शैक्षणिक समस्या इ. चित्रण आलेले आहे . दलित समाजवर्गाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मिळालेली प्रेरणा या बाबींचाही अभ्यास करावा लागतो.

दलित कादंबरीविषयी असे सांगता येईल की, दलित कादंबरी ही धर्म, जात, विषमता आणि मानवी मूल्य जोपासणारी संस्कृती इ. मधून दलित समाजजीवन दर्शनाचे रुप घडविते. दलित कादंबरी ही १९६० नंतर मराठी साहित्यात लक्ष वेधून घेणाऱ्या दलित साहित्याच्या महावृक्षाची एक शाखा होय.

'मराठी दलित कादंबरीतील सामाजिकता : एक विवेचक अभ्यास' (इ.स. १९६० ते १९९०) या संशोधन विषयाचा अभ्यास करताना मराठी दलित कादंबरी : उगम आणि वाटचाल, मराठी दलित कादंबरी : प्रेरणा व स्वरुप, मराठी दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा, मराठी दलित कादंबरीतील सामाजिकतेचे स्वरुप, मराठी दलित कादंबरीची भाषाशैली, मुल्यमापन व निष्कर्ष इ. प्रकरणाचा अभ्यास करावा लागेल. संशोधन विषयातील प्रकरणाची विभागणी ही खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

प्रकरण १ले :

मराठी दलित कादंबरी : उगम आणि वाटचाल

प्रकरण २रे :

मराठी दलित कादंबरी : प्रेरणा व स्वरूप

प्रकरण ३रे :

मराठी दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा (इ.स. १९६० ते १९९०)

प्रकरण ४थे :

मराठी दलित कादंबरीतील सामाजिकतेचे स्वरूप (इ.स. १९६० ते १९९०)

प्रकरण ५वे :

मराठी दलित कादंबरीची भाषाशैली (इ.स. १९६० ते १९९०)

प्रकरण ६वे :

मूल्यमापन व निष्कर्ष

प्रकरण १ले
मराठी दलित कादंबरी : उगम आणि वाटचाल

या प्रकरणामध्ये स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर दलित जीवनाचे चित्रण मराठी कादंबरीत आले आहे. मराठीत कादंबरी हा साहित्यप्रकार समाजवास्तवनिष्ठ स्वरूपाचा आहे. मराठीतील कादंबरी या वाङमय प्रकारामध्ये ग्रामीण कादंबरी, दलित कादंबरी, स्त्रीवादी कादंबरी, प्रादेशिक कादंबरी, बाल कादंबरी इत्यादींचा समावेश होतो. त्यापैकी दलित कादंबरीचा अभ्यास करावयाचा आहे.

दलित साहित्यातील कादंबरी हा साहित्यप्रकार साठोत्तरी कालखंडानंतर उदयास आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे प्रेरणास्थान आहेत. अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातून दलित समाजाला नवी दिशा व प्रेरणा मिळाली. स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये दलितेतरांच्या साहित्यात दलित जीवनाचे चित्रण आले आहे. उदा. ना. सी. फडके यांची 'प्रतिज्ञा' (१९४२), श्री. म. माटे यांची 'उपेक्षितांचे अंतरंग' (१९४१), 'ग. त्र्यं. माडखोलकर यांची 'चंदनवाडी' (१९४३), साने गुरुजी यांची 'रामाचा शेला' (१९४४), श्री. व्यं. केतकर यांची 'ब्राम्हण कन्या' (१९३०), इ. कादंबऱ्यातून दलित जाणिवेचे संदर्भ येतात. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये दलितेतरांच्या कांही कादंबरऱ्यांचा उल्लेख करावा लागतो. उदा. व्यंकटेश मांडगूळकर यांची 'बनगरवाडी' (१९५५), ग. दि. माडगूळकर यांची 'आकाशाची फळे' (१९६०) इ. कादंबऱ्यातून दलित समाजाचे जीवन दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर दलित लेखकांनी आपल्या साहित्यातून वेदना, विद्रोह, नकार, मानवतावाद, संघर्ष, जातीयता, अस्पृश्यता, स्त्रियांवरील अत्याचार इ.चे चित्रण केले आहे. उदा. अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' (१९५९), शंकरराव खरात यांची 'हातभट्टी' (१९७०), बाबुराव बागूल यांची 'सूड' (१९७०), ना. रा. शेंडे यांची 'तांबडा दगड' (१९५८), केशव मेश्राम यांची 'पोखरण' (१९७९), नामदेव ढसाळ यांची 'हाडकी हाडवळा' (१९८१), डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची 'अक्करमाशी' (१९८४) इ. कादंबऱ्यामधून दलित समाजाचे वास्तव जीवनदर्शन चित्रित होते. अण्णाभाऊंच्या साहित्यापासून दलित कादंबरीची वाटचाल जोमाने सुरु झाली. या प्रकरणातून दलित कादंबरीचा उगम व वाटचालीचा आढावा घ्यावयाचा आहे .

प्रकरण २रे

मराठी दलित कादंबरी : प्रेरणा व स्वरूप

या प्रकरणामध्ये दलित कादंबरीला मिळालेली प्रेरणा व दलित कादंबरीचे स्वरूप या विषयांची चर्चा करावयाची आहे . इ.स. १९६० पूर्वीच्या दलित कादंबरीतील जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था व समाजव्यवस्था इ. परिस्थितीचा अभ्यास विविध लेखकांनी केलेला आहे. इ.स. १९६० नंतर दलित कादंबरी ही भारतीय समाजातील वास्तववादी लय मिळणारी आहे. आजची दलित कादंबरी नव्या संस्कृतीची अपेक्षा करणारी, संस्कृती संयोगाने परिवर्तन करणारी आहे. आधुनिक दलित कादंबरी ही भारतीय समाजाची स्वप्न साकार करणारी आहे.

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतून दलित कादंबरी लेखन होवू लागले आहे. दलित कादंबरीविषयी असे म्हणता येईल की, दलित कादंबरी ही दलित समाजजीवनाचे दर्शन घडविते . दलित कादंबरी निर्मितीची मुख्य प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व तत्वज्ञान होय.

दलित कादंबरीमधून दलित जीवनानुभव, सामाजिक बाधिलकी, पोषक वातावरण निर्मिती, वास्तवानुभव, प्रभावी बोलीभाषा, प्रभावी व्यक्तिरेखा इ. स्वरूप सांगता येते. दलित कादंबरीत महार, मांग, ढोर, चांभार, देवदासी, आदिवासी, वेश्या, मुरळी, मसनजोगी, भटके-विमुक्त, मांग-गारुडी अशा भिन्न सामाजिक स्तरावरील स्त्री-पुरुषांचे चित्रण केले आहे. या प्रकरणातून मराठी दलित कादंबरीचे स्वरूप व प्रेरणा याची चिकित्सा करावयाची आहे.

प्रकरण ३रे

मराठी दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा (इ.स. १९६० ते १९९०)

या प्रकरणात इ.स. १९६० ते १९९० कालखंडातील मराठी दलित कादंबरी लेखनातील व्यक्तिरेखांची चर्चा करावयाची आहे . मराठी दलित कादंबरीला झुंजार आणि बंडखोर नायक आणि नायिका देणारे महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून अण्णाभाऊ साठे यांचा उल्लेख करावा लागतो. अण्णाभाऊच्या 'फकिरा' (१९५९),'वैर' (१९६४), 'माकडीचा माळ' (१९६३), व 'वारणेचा वाघ' (१९६८), या कादंबऱ्यातील नायक हा संघर्षवादी, साम्यवादी, लोकनायक, क्रांतिकारक दिसून येतात. तर अण्णाभाऊच्या 'वारणेचा वाघ' (१९६८), 'चंदन' (१९६२), 'चिखलातील कमळ' (१९६५), 'फुलपाखरु' (१९७७) या कादंबऱ्यातील नायिका हया बाणेदार वृत्ती, धाडसी स्वभाव, अन्यायाविरुध्द लढा

देणाऱ्या दिसून येतात. शंकरराव खरातांच्या ‘हातभट्टी’ (१९७०), ‘मी मुक्त! मी मुक्त!’ (१९७१) इ. कादंबरीतून नायक हा कणखर वृत्तीच्या भ्रष्टाचाराविरुध्द लढा देणारा दिसून येतो.

बाबुराव बागुल यांच्या ‘सूड’ (१९७०), ‘अघोरी’ (१९८१) या कादंबरीतून नायिकांची स्वाभिमानी वृत्ती, अन्यायाविरुध्द लढा देणारी दिसून येते. सुधाकर गायकवाड यांच्या ‘शूद्र’ (१९८०) या कादंबरीतील नायक हा शूद्रत्वाचा डाग घेऊन जीवन जगताना दिसतो. ज. वि. पवार यांच्या ‘बलिदान’ (१९७०) या कादंबरीमध्ये स्त्री पात्रे ही दलित स्त्रियांची प्रतिनिधित्व करताना दिसतात. केशव मेश्राम यांच्या ‘हकिकत’ (१९७२), या कादंबरीमध्ये एका दलित नायकाच्या ‘मी’ च्या जीवनातील आठ-दहा वर्षाच्या कालखंडातील अनुभवाचे चित्रण केले आहे. ना. ब. जाधव यांच्या ‘डॉ. अंजना’ (१९७२) या कादंबरीतील नायिका सवर्णव्यवस्थेशी लढा देणारी आहे दलित कादंबरीतील नायक आणि नायिकांची संघर्षवादीच्या वृत्ती दिसून येते. १९६०-९० या कालखंडातील दलित कादंबरीतील व्यक्तिरेखांचे स्वभाव विशेष तसेच त्यांचे भावविश्व, कौटुंबिक जीवन व अन्यायाविरूध्द लढणारे नायक यांच्या व्यक्तिमत्वाचा वेध या प्रकरणातून घ्यावयाचा आहे .

प्रकरण ४थे

मराठी दलित कादंबरीतील सामाजिकतेचे स्वरूप (इ.स. १९६० ते १९९०)

या प्रकरणामध्ये इ.स. १९६० ते १९९० या कालखंडातील दलित कादंबरीचे सामाजिक स्वरूप या विषयाच्या अनुषंगाने मांडणी करावयाची आहे. विसाव्या शतकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलितमुक्ती लढयामुळे हजारो वर्षाच्या दुःखाचे ओझे असल्याची जाणीव दलितांना झाली. ज्यांनी वर्णव्यवस्थेद्वारे ही गुलामगिरी लादली त्या सवर्णापुढेही हे ओझे उघड करुन दाखवायचे होते. म्हणून दलित लेखक सतत भूतकाळाविषयी लिहू लागले. उदा. केशव मेश्राम यांच्या ‘पोखरण’ (१९७९) या कादंबरीतून सनातन दुःख दिसून येते तर बाबुराव बागुलाच्या ‘सूड’ (१९७०) या कादंबरीतून सनातन दुःख दुर केलेले दिसून येते. दलित लेखकांनी आपल्या दलित साहित्यकृतीतून सामाजिक वस्तुस्थितीचे दर्शन घडविले.

दलित समाजातील जातीय उतरंडीचा प्रत्यक्ष अनुभव दलित लेखकांना असल्यामुळे त्यांनी केलेले जातीय व्यवस्थेचे चित्रण प्रत्ययकारी झाले आहे. दलित लेखकाच्या कादंबऱ्यातून दलितांचे वर्णव्यवस्था, जातीय स्तरभेद, अनेक पोटजातीची पृथगात्म वैशिष्टये, त्यांची संस्कृती, व्यावसायिक भेद, बोलीभाषा, मिथके, आचारधर्म, रुढी, परंपरा,

रिती-रिवाज, सामाजिक संकेत, स्त्री-पुरुष संबंधाचे स्वरूप, न्यायव्यवस्था, जात पंचायतीचे स्वरूप, नीतीविषयक नियम इत्यादीचा परिचय होतो.

मानवी जीवनाकडे आंबेडकरवादी दृष्टीने पाहून मानवी मनाची मीमांसा करणे हे दलित कादंबरीचे तत्त्व आहे. दलित कादंबरी प्रामुख्याने सामाजिक बांधिलकीचा स्वीकार करते. विद्रोहाच्या पातळीवर आविष्कृत झालेली असून दलितांच्या आयुष्याचे सुख-दुःख, आकांक्षा यांचे चित्रण दलित कादंबरीमधून यशस्वीपणे आले आहे. मराठी कादंबरीपेक्षा वेगळे जीवन व वेगळी संवेदनशीलता घेऊन आलेली दलित कादंबरी ही पारंपारिक व्यवस्थेविरुध्द विद्रोह पुकारुन न्याय हस्तगत करण्यासाठी सज्ज झाली आहे. दलित कादंबरीमधून व्यक्तिरेखा ही परिवर्तनवादी दृष्टिकोनाची दिसते.

शैक्षणिक समस्या आणि दलितांना लाभलेला भीम संदेश यांचा दलित कादंबरीने अंगीकार केला. दलित कादंबरीमध्ये वेदना, विद्रोह, नकार, मानवतावाद, वैज्ञानिक दृष्टी, जाती-व्यवस्था, समाज-व्यवस्था, वर्ण-व्यवस्था, अस्पृश्यता, स्त्रियावरील अत्याचार इ. दलित कादंबरीचे सामाजिक स्वरूप दलित लेखकांनी आपल्या लेखनातून प्रभावीपणे मांडले आहे.

दलित कादंबरी ही स्थूल अर्थाने प्रतिकारवादी लेखनाचा आविष्कार आहे. नव्या सांस्कृतिक शोधाची आणि भविष्याच्या वाटचालीसाठी आपले स्थान निर्माण करणारी आहे. दलित कादंबरीतून सामाजिकता, मानवतावादी दृष्टिकोन, जीवनानुभव, संघर्षवादी दृष्टिकोन पाहावयास मिळते. या सामाजिकतेची चिकित्सा या प्रकरणात अपेक्षित आहे .

प्रकरण ५वे

मराठी दलित कादंबरीची भाषाशैली (इ.स. १९६० ते १९९०)

या प्रकरणामध्ये इ.स. १९६० ते १९९० या कालखंडातील मराठी दलित कादंबरीतील भाषाशैलीचा अभ्यास करावयाचा आहे. दलित कादंबरीत लेखकाने आपल्या बोली भाषेचा वापर करुन उत्कृष्ट साहित्यकृती निर्माण केली आहे. दलित कादंबरीत आशयानुरोधाने भाषारूप बदलत असते, म्हणून लेखक त्याचे यथातथ्य मनोरेखन करणारी पृथगात्मक भाषा, उपयोजिलेली दिसते. दलित कादंबरीतील संवाद, निवेदन, म्हणी, वाक्यप्रचार, प्रतिमा, रूपके, वातावरणनिर्मिती , निसर्गचित्रण इ. अभ्यास या प्रकणात करावयाचा आहे.

प्रकरण ६वे

मूल्यमापन व निष्कर्ष

या प्रकरणामध्ये मूल्यमापन व निष्कर्ष मांडावयाचे आहेत. या संशोधनप्रबंधामध्ये मांडलेल्या प्रकरणाची चर्चा व त्यामधून मिळालेल्या निष्कर्षाच्या नोंदी या प्रकरणात नोंदवावयाच्या आहेत. या विषयाचे अध्ययन व संशोधन करताना वरील प्रकरणामध्ये किंवा प्रकरणाच्या स्वरूपामध्ये थोडेफार बदल होऊ शकतील.

संदर्भग्रंथ सूची

१.	दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह	-	भालचंद्र फडके
२.	दलित साहित्य : उद्गम आणि विकास	-	डॉ. योगेंद्र मेश्राम
३	दलित साहित्यः प्रेरणा आणि स्वरूप	-	डॉ. वसंत डोळस
४.	मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा	-	डॉ. रवींद्र ठाकूर
५.	वाङ्मयीन प्रवृत्ती : तत्वशोध	-	संपादक : केशव मेश्राम
६.	दलित साहित्य	-	डॉ. म. सु. पगारे
७.	दलित साहित्याची संकल्पना	-	डॉ. जयवंत व्हटकर
८.	दलित साहित्य चिकित्सा	-	डॉ. सदा कऱ्हाडे
९	दलित समीक्षेचे स्वरूप	-	डॉ. शत्रुघ्न जाधव
१०.	दलित साहित्यातील स्त्री चित्रण	-	डॉ. सुनील चंदनशिवे
११.	साठोत्तरी मराठी वाङ्मयातील नवप्रवाह	-	डॉ. शरणकुमार लिंबाळे
१२.	शतकातील दलित विचार	-	डॉ. शरणकुमार लिंबाळे

संशोधक

श्री. गितेश महादेव कटकदौंड